“मिशन शौर्य-२ “ मध्ये सहभागी विद्यार्थाच्या
गौरवार्थ बक्षीस प्रदान करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः शाआशा-२०१८/प्र.क्र.३३१/का.१३**
मंत्रालय,मुंबई -४०० ०३२
तारीख: ३० जुलै,२०१९

**वाचा**

**शासन निर्णय आदिवासी विकास विभाग, क्रमांक : शाआशा-२०१८/प्र.क्र.३३१/का.१३, दि. ३ नोव्हेंबर, २०१८.**

**प्रस्तावना**

आदिवासी विकास विभागातंर्गत चालविण्यात येणा-या आश्रमशाळा व वसतीगृहामध्ये सुमारे ५ लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहे. आदिवासी विद्यार्थासमोर मोठे ध्येय ठेवल्यास ते ध्येय गाठण्यासाठी ते सर्वतोपरी कठोर परिश्रम करतील आणि अन्य विद्यार्थासमोर आदर्श निर्माण करावा या उद्देशाने आदिवसी विकास विभागामार्फत विशेष प्रकल्प राबविण्याचे निश्चित करण्यात आले. याचाच एक भाग म्हणून सन २०१८ मध्ये आदिवासी विकास विभागातंर्गत प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प चंद्रपूर व जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचे सहकार्याने माऊंट एवरेस्ट शिखर सर करण्यासाठी “मिशन शौर्य” ही मोहीम राबविण्यात आली होती. यांच मोहिमेची पुर्नरावृत्ती म्हणून सन २०१९ मध्ये “मिशन शौर्य-२” दोन ही मोहिम राबविण्यात आली. या अंतर्गत राज्यातील शासकीय व अनुदानित आदिवासी आश्रमशाळतील शारिरिक दृष्टया तंदुरुस्त व मानसिक दृष्टया कणखर अशा २०३ विद्यार्थाची निवड करण्यात आली या मोहिमेअतंर्गत या विद्यार्थांना वर्षभर विविध ठिकाणी प्रशिक्षण देण्यात आले. मिशन शौर्य अंतर्गत माऊंट एवरेस्ट शिखर सर करण्यासाठी अंतिम निवड झालेले ११ विद्यार्थ्यांना झेंडा ( Flag off) दाखवून दि.५/४/२०१९ रोजी मुंबई येथून रवाना केले होते. सदर ११ विद्यार्थापैकी ९ विद्यार्थांनी दि. २३ मे, २०१९ रोजी एवरेस्ट शिखर सर करण्याची धाडसी मोहीम पूर्ण केली आहे. आदिवासी विद्यार्थाना संधी उपलब्ध करुन दिल्यास ते जीवनातील कोणतेही मोठे ध्येय साध्य करु शकतात यावरुन सिध्द होत आहे. “मिशन शौर्य-२” या यशस्वी मोहिमेमध्ये आदिवासी समाजातील सर्व घटकापर्यंत आत्मविश्वासाचा संदेश पोहोचणार आहे. तसेच या मोहिमेमध्ये राज्यभरातल्या आदिवासी विद्यार्थापुढे आदर्श निर्माण झालेला आहे. यामुळे भविष्यात देखील शासकीय आश्रमशाळामधील आदिवासी विद्यार्थाना साहसी क्रीडा प्रकारातील खेळाकरिता प्रोत्साहन मिळणार आहे. सदर धाडसी मोहीम पूर्ण करुन आदिवासी विद्यार्थानी महाराष्ट्र राज्याच्या लौकिकात भर घातली आहे. तरी सदर यशाच्या गौरवार्थ विशेष बाब म्हणून संबंधित विद्यार्थाना व त्यांच्या कुंटुंबाना बक्षीस स्वरुपात लाभ देण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. त्यानूसार शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

## शासन निर्णय:-

१) "मिशन शौर्य-२" मध्ये यश संपादन केलयाच्या गौरवार्थ सदर मोहिमेत सहभागी विद्यार्थाच्या व त्यांच्या पालकांसाठी खालीलप्रमाणे लाभ देण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

१. एव्हरेस्ट मोहिमेमध्ये यशस्वी झालेल्या सोबतच्या विवरण पत्रातील अनुक्रमांक १ ते ९ या नऊ विद्यार्थाना प्रत्येकी रु.२५.०० लाख रोख रक्कम पुरस्कारासह सन्मानचिन्ह प्रदान करण्यात यावे. तसेच यशाने हुलकावणी दिलेल्या तथापि, मोहिमेस सहभागी झालेल्या सोबतच्या विवरण पत्रातील अनुक्रमांक १० व ११ या दोन विद्यार्थांना प्रत्येकी रु.१०.०० लाख रोख रक्कम पुरस्कारासह सन्मानचिन्ह प्रदान करण्यात यावे.

२. सदर विद्यार्थाचे यापुढील मोफत शिक्षण व त्यांचे भविष्य विकसित करण्यासाठीची जबाबदारी आदिवासी विकास विभागामार्फत स्वीकारण्यात येत आहे. संबंधित प्रकल्प अधिकारी व अपर आयुक्त हे यासाठी जबाबदार राहतील.

३. तसेच सदर विद्यार्थी अत्यंत दुर्गम भागातील गरीब कुटुंबातील असल्याने सदर कुंटुंबाला शासनाच्या सर्व विभागाच्या अस्तित्वातील योजनांचा प्राधान्याने लाभ देण्यात यावा. यासाठी संबंधित जिल्हाधिकारी व प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांनी एक महिन्यात आराखडा तयार करुन कार्यवाही करावी.

२) उपरोक्त पुरस्कारातील रोख रकमेवरील खर्च सन २०१९-२० या आर्थिक वर्षाच्या आश्रमशाळा समूह (२२२५ D७३४) या लेखाशिर्षाखाली ५०- इतर खर्च या बाबीखालील तरतुदीतून भागविण्यात यावा याकरिता संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे

३) प्रकल्प अधिकाऱ्यांमार्फत सदर रोख रकमेपैकी २० टक्के रक्कम संबंधित विद्यार्थाच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट जमा करण्यात यावी, तर उर्वरित ८० टक्के रक्कम सदर विद्यार्थाच्या भविष्याकरिता पाच वर्षाच्या मुदत ठेवीच्या स्वरुपात ठेवण्यात यावी. सदर मुदत ठेवीचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर संबंधित विद्यार्थी व प्रकल्प अधिकारी यांच्या संयुक्त स्वाक्षरीने मुदत ठेवीची रक्कम काढता येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७३०१५३४१०१९२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Subrao Narayan Shinde

Digitally signed by Subrao Narayan Shinde
DN: CN = Subrao Narayan Shinde, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Tribal Development Department
Date: 2019.07.30 15:46:50 +05'30'

**( सु. ना. शिंदे )**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव,राजभवन,मुंबई
२. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव, मंत्रालय,मुंबई
३. मा.मंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
४. मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय ,मुंबई
५. मा.मंत्री (शालेय शिक्षण व क्रिडा) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
६. मा.राज्यमंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
७. मा. अप्पर मुख्य सचिव,वित्त विभाग,यांचे स्वीय सहायक,मंत्रालय,मुंबई
८. प्रधान सचिव,आदिवासी विकास विभाग यांचे स्वीय सहायक,मंत्रालय,मुंबई
९. आयुक्त,आदिवासी विकास,नाशिक
१०.आुयक्त,आदिवासी संशोधन प्रशिक्षण संस्था, पुणे
११.अपर आयुक्त,आदिवासी विकास,नागपूर/अमरावती/ठाणे/नाशिक
१२.सर्व प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
१३.जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,जिल्हा नियोजन समिती, अमरावती, नाशिक, धुळे, पालघर व चंद्रपूर.
१४.महालेखापाल (लेखापरिक्षा) (लेखा व अनुज्ञयेता) महाराष्ट्र -१/२ ,मुंबई/नागपूर
१५.सर्व सहसचिव/उप सचिव आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
१६.सर्व अवर सचिव /कार्यासन अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,मुंबई.
१७. निवड नस्ती कार्यासन १३.

## मिशन शौर्य - २ अंतर्गत एव्हरेस्ट सर करण्यासाठी गेलेल्या विद्यार्थ्यांची यादी

| अ. क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | शाळेचे नाव | प्रकल्प कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | मुन्ना साबुलाल धिकार | शासकीय माध्यमिक, उच्च माध्यमिक आश्रमशाळा, टेंबली | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी. |
| २ | कु. अंतुबाई अनारद्रव कोटनाके | मा. विठ्ठलराव पटवर्धन शासकीय आश्रमशाळा, आसापूर | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपूर. |
| ३ | मनोहर गोपाळ हिलीम | उत्कर्ष अनुदानित आश्रमशाळा, वाघेरा | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक. |
| ४ | कु. चंद्रकला उत्तम गावित | अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, इंदवे | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धुळे. |
| ५ | कु. हेमलता अंबादास गायकवाड | अनुदानित आश्रमशाळा, अलंगण | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कळवण. |
| ६ | केतन सिताराम जाधव | माधवराव काणे अनुदानित आश्रमशाळा, देवगाव | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार. |
| ७ | अनिल पांडुरंग कुंदे | शासकीय आश्रमशाळा, बोरीपाडा | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक. |
| ८ | सुरज देवराव आडे | शासकीय आश्रमशाळा, देवाढा | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपूर. |
| ९ | सुग्रीव आत्माराम मंदे | एकलव्य निवासी शाळा, चिखलदरा | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी. |
| १० | शिवचरण बिसराम भिलावेकर | शासकीय आश्रमशाळा, बिजुधावडी | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी. |
| ११ | कु. सुषमा वासुदेव मोरे | शासकीय आश्रमशाळा, कापरा | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा. |